


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १३०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२३ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## भारताशी समेट करा नाहीतर... दादा देशानं बांगलादेशला दाखवला आरसा



बांग्लादेशमध्ये सध्या तणावपूर्ण परिस्थिती आहे आणि भारतासोबतचे त्यांचे संबंधही बिघडले आहेत. गेल्या काही काळात, बांगलादेशातील भारतीय दूतावासावर हल्ले झाल्याच्या आणि भारतविरोधी घोषणाबाजी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. यासोबतच, बांगलादेशात अल्पसंख्याकांवर होणाऱ्या सततच्या हिंसाचारामुळे भारतातही मोठी नाराजी आहे. अशा परिस्थितीत, बांगलादेशातील रशियाचे राजदूत अलेक्झांडर ग्रिगोरीविच खोजिन यांनी दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याची विनंती केली आहे.

**राजदूत काय म्हणाले?**

बांगलादेशातील रशियाचे राजदूत अलेक्झांडर ग्रिगोरीविच खोजिन यांनी सोमवारी बांगलादेशला तणाव कमी करण्याचे आवाहन केले. पुढील वर्षी १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय निवडणुकांपूर्वी चांगले वातावरण तयार व्हावे, अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यांनी भारतासोबतचा तणाव कमी करण्याच्या महत्त्वावरही जोर दिला. बांगलादेशातील रशियन राजदूत म्हणाले की, हे जितक्या लवकर होईल तितके चांगले. त्यांनी स्पष्ट केले की ते दोन्ही देशांच्या आपापसातील संबंधांमध्ये हस्तक्षेप करत नाहीत, परंतु त्यांना वाटते की असा मार्ग काढणे शहाणपणाचे ठरेल, ज्यामुळे तणाव सध्याच्या पातळीपेक्षा पुढे वाढणार नाही. त्यांनी असेही म्हटले की, संबंध हे परस्पर विश्वास आणि समजुतीवर आधारित असले पाहिजेत.

**✲ आंदोलन सुरू ठेवण्याचं कारण काय?**

बांगलादेशातील होऊ घातलेल्या निवडणुकांबद्दल बोलताना, राजदूतांनी आशा व्यक्त केली की मतदान वेळेवर होईल. निवडणूक निरीक्षकांना पाठवण्याबाबत विचारले असता, राजदूत म्हणाले की ते निवडणूक आयोगाच्या संपर्कात आहेत आणि आयोगाकडून अधिकृत निमंत्रणाची वाट पाहत आहेत. किमान निवडणुकांचे वेळापत्रक पुढे ढकलून आपली सत्ता टिकवून ठेवू इच्छितात. याच विचाराने ते आपले आंदोलन सुरू ठेवत आहेत. त्यांच्याकडे काही यूट्यूबर आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर येऊन भडकवणारे लोक आहेत, ज्यांना सतत लोकांना चिथावणी देण्यास सांगितले जात आहे. याव्यतिरिक्त, त्यांच्याकडे हिज्ब उत-तहरीर आणि जमात-ए-इस्लामीचे विद्यार्थी संघटना शिबिर यांसारखे काही अतिरेकी राजकीय पक्षही आहेत. त्यामुळे ते देशात सामाजिक अस्थिरता निर्माण करण्यासाठी या संसाधनांचा सतत वापर करत आहेत.

**✲ संपूर्ण देशात भारतविरोधी भावना नाही...**

बांगलादेशातील माजी मंत्री मोहिबुल हसन चौधरी म्हणाले की, 'भारतविरोधी निदर्शने केवळ ढाका आणि चटगावच्या काही भागांपुरती मर्यादित आहेत. असे नाही की संपूर्ण देशात भारतविरोधी भावना आहे. वेगवेगळ्या संस्थांमधील काही उग्र, अतिरेकी, कट्टरपंथी विद्यार्थ्यांनी, अनेक मदरशांतील विद्यार्थ्यांना आपल्यासोबत सामील होण्यास भाग पाडले आहे. यामध्ये कौमी मदरसे आणि स्वतः ढाका विद्यापीठाचे विद्यार्थीही सामील आहेत. जे मदरशांतील विद्यार्थी कॅम्पसमध्ये राहतात, ते खाण्यापिण्यासाठी आणि राहण्यासाठी पूर्णपणे मशिदींवर अवलंबून असतात. जर त्यांना या मिरवणुकांमध्ये सामील होण्यास भाग पाडले गेले, तर त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नसतो. असे न केल्यास, ते त्यांची एकमेव आश्रयस्थान, जेवण आणि राहण्याची जागा गमावून बसतील.'

## दैनिक अक्षराज ची दिनदर्शिका वाचकांच्या भेटीला

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** नवीन वर्ष सुरू झाले की, वाचकांना सर्वप्रथम आठवण येते ती म्हणजे दिनदर्शिकेची नेमकी वाचकांची हीच गरज ओळखून नवीन वर्षात दैनिक अक्षराजने दिनदर्शिका २०२६ ची अनोखी भेट दिली आहे. दर्जेदार कागद, सुबक छपाई, तिथी आदींसह इत्यंभूत माहिती ही या दिनदर्शिकेची मुख्य वैशिष्ट्य आहेत. हातात स्मार्टफोन, वॉच आली, तरी दिनदर्शिकेची क्रेझ कमी झालेली नाही. नविन वर्षाची चाहूल लागली की, प्रत्येक घरात, कार्यालयात, कॅलेंडर येते. त्यामुळे अनेक थीम घेऊन वेगवेगळ्या प्रकारचे कॅलेंडर छपाई करण्याचा ट्रेंड सध्या वाढला आहे.




श्री.विनोद गोरे व सौ.प्राजक्ता चव्हाण - गोरे यांनी संपादित केलेल्या दैनिक अक्षराजनेही असाच एक प्रयोग या वर्षी चौथ्यांदा करत दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. यामध्ये तारखा, मुहूर्त, चंद्रोदय, जयंती, पुण्यतिथी, दिनविशेष, अशा माहितीपूर्ण महिन्याच्या नोंदींचा खजिना आहे. वाचकांच्या विश्वासामुळेच दैनिक अक्षराज अल्पावधीतच महाराष्ट्रात रुजले. सकारात्मक, निर्भिड आणि रोखठोक पत्रकारिता करत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांचा आवाज बनले. सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी प्रसंगी आक्रमक असलेल्या दैनिक अक्षराजने आता वाचकांना नवीन वर्षात दिनदर्शिकेच्या रुपाने अनोखी भेट दिली आहे.

## ठाणे वनविभागातर्फे कल्याण-शीळ परिसरातून मादी 'सोनेरी कोल्ह्याचे' यशस्वी रेस्क्यू



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** कल्याण-शीळ रोडवरील पडले गाव, मुक्त रेसिडेन्सी परिसरात एका वन्यप्राण्याचा वावर असल्याची माहिती शिळ फाटा अग्निशमन दलाने वनविभागास कळविली होती. या माहितीची तात्काळ दखल घेत ठाणे वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाने तातडीने रेस्क्यू मोहीम राबवून एका मादी सोनेरी कोल्ह्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले. सदर कारवाई वन परिमंडळ अधिकारी संदीप सिताराम मोरे, कळवा वन परिमंडळाचे कर्मचारी वृंद आणि 'V Charitable Trust' व 'DLAW' संस्थेचे वन्यजीव स्वयंसेवी विशाल कंथारिया यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली. रेस्क्यू करण्यात आलेली मादी अंदाजे १ ते २ वर्षे वयाची असून, ती वन्यजीव संरक्षण कायद्याच्या 'शेड्यूल १' अंतर्गत संरक्षित आहे.सध्या या वन्यप्राण्याला पुढील वैद्यकीय तपासणी व निरीक्षणासाठी वन्यजीव परागमन केंद्र (TTC), डायघर येथे हलवण्यात आले असून तिची प्रकृती स्थिर आहे. वनविभागाच्या नियमांनुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, नागरिकांनी वन्यजीव आढळल्यास तात्काळ वनविभागाच्या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र मुठे यांनी केले आहे.

## ट्रॅक्टरचा एसटीला कट, ५० प्रवाशांनी भरलेली बस अचानक घसरली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, जळगाव :** पाचोरा आगारातून वडगावकडे निघालेली बस ट्रॅक्टरने कट मारल्याने रस्त्याच्या कडेला घसरली. या अपघातात कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी पुढील होणारा अनर्थ निश्चित टळला आहे. पाचोरा आगारातून २२ डिसेंबरला सायंकाळी ५:३० वाजता प्रवाशी व विद्यार्थी घेऊन बस क्रमांक एम. एच. १४ बी. टी. २६११ ही पाचोरा ते वडगांवच्या दिशेने निघाली.

मोंढाळे ते निंभोरी गावा दरम्यान निंभोरी गावच्या माजी सरपंच मिनाक्षी विनायक दिवटे यांच्या गट क्रमांक २७ नजीक शेताजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रॅक्टरने बसला कट मारला. यामुळे बस रस्त्याच्या कडेला



असलेल्या खड्ड्यात घसरली. सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी पुढील अनर्थ टळला. स्टेअरिंग फिरल्याने बस चालकाच्या हाताला इजा झाली आहे. घटनास्थळी ग्रामस्थांनी धाव घेत बसच्या काचा फोडून आत अडकलेल्या प्रवासी व विद्यार्थ्यांची सुटका केली. अर्जुन राठोड, भगवान नलावडे, सागर पाटील, रामराव दिवटे, कोतवाल महेंद्र राऊतराय, सागर मोरे यांच्यासह अनेकांनी प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. अपघात झाल्यानंतर सुमारे अर्धा तास वाहतुकीचा खोळंबा झाला होता. पाचोरा ते सातगाव (डोंगरी) रस्त्याचे काम सुरू असल्याने साईड पट्टीवर माती असल्याने बस घसरली. सर्व प्रवाशांना सुखरुप बाहेर काढून क्रेनच्या साहाय्याने बस काढण्यात आली. अपघात घडला त्यावेळी बसमध्ये ५० प्रवासी व विद्यार्थी होते. घटनेची माहिती मिळताच पाचोरा आगाराचे व्यवस्थापक प्रकाश पाटील यांच्यासह अनेकांनी घटनास्थळी धाव घेत प्रवाशांची विचारपूस केली.

## मुंबईलाही जोडणार शक्तीपीठ महामार्ग, विस्तारामुळे होणार ८४० किमी लांब

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नागपूर :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या मार्गात महत्त्वाचे बदल केले आहेत. हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वादग्रस्त प्रकल्पाचा मार्ग बदलण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आता नव्या मार्गाची सविस्तर रूपरेषा समोर आली आहे.

यापूर्वी शक्तीपीठ महामार्ग वार्ध्यातील पावनार येथून गोवा सीमेवरील पत्रादेवीपर्यंत प्रस्तावित होता. हा महामार्ग ८०३ किमी लांबीचा असून, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर विकसित करण्याचा प्रस्ताव होता. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणाला जोडणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात होता.

**काय आहेत बदल?**

नव्या बदलांनुसार या महामार्गात आता सातारा जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चांडगडमार्गे हा मार्ग पुढे नेण्यात येणार असून, त्यामुळे भविष्यात या द्रुतगती



मार्गाला मुंबईशी जोडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, शक्तीपीठ महामार्गाची एकूण लांबी वाढून ८४० किमी होणार असून, तो राज्यातील सर्वात लांब द्रुतगती महामार्ग ठरणार आहे.

MSRDCच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कोल्हापूर जिल्ह्यात शेतकरी आणि जमीनमालकांकडून सुरू असलेल्या तीव्र विरोधामुळे मार्गात बदल करण्यात आला. सुपीक शेती जमीन नष्ट होणे आणि पर्यावरणीय परिणामांबाबत स्थानिकांनी चिंता व्यक्त केली होती. भूसंपादनाविरोधातील आंदोलनांमुळे हा प्रकल्प वर्षभराहून अधिक काळ रखडला होता. या मुद्द्याचा परिणाम पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत अलीकडील लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला भोगावा लागल्याचेही बोलले जाते.

या बदलांमुळे प्रकल्पाचा खर्च ८६ हजार कोटींवरून वाढून सुमारे ९० हजार कोटी रुपये इतका झाला आहे. अंतिम मंजुरीनंतर नव्याने समाविष्ट भागांमध्ये संयुक्त भू-मापन आणि भूसंपादन प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. किमान ७० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. मुंबईला कसा जोडणार?

शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग लातूर जिल्ह्यातील मुरुड येथे जन कल्याण महामार्गाशी जोडण्यात येणार आहे. वर्धा ते सांगलीदरम्यान लातूर आणि सोलापूरमार्गे जाणारा सुमारे ४४२ किमी लांबीचा हा टप्पा, जन कल्याण महामार्ग आणि मुंबई-बार्शी रस्त्याच्या माध्यमातून मुंबईपर्यंत पोहोचण्याचा नवा पर्याय उपलब्ध करून देणार आहे. भविष्यात मुंबई महानगर प्रदेशाशी संपर्क अधिक मजबूत करण्यासाठी हा द्रुतगती महामार्ग प्रस्तावित विरार-अलिबाग कॉरिडॉरलाही जोडण्याची योजना आहे.

## एक किलो सोन्यावरुन ब्लॅकमेल, उच्चशिक्षित आरोपींनी नेमकं काय केलं?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छ. संभाजीनगर :** तुम्ही १ कोटी रुपयांच्या सोन्याची स्मगलिंग केली असून तुमच्याविरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे, अशी भीती दाखवली आणि पोलिस असल्याची थाप मारून अल्पवयीन मुलाकडून एकूण अडीच लाख रूपये किंमतीचे सोन्याच्या दागिने खंडणी स्वरूपात घेतल्याचा प्रकार समोर आली. या प्रकरणात छत्रपती संभाजीनगरमधील जवाहरनगर पोलिसांनी वेदांत राजकुमार राठोड (वय २२, रा. तिसगाव ता. खुलताबाद, ह.मु. दत्त मंदिर, बंजारा कॉलनी), गौरव ज्ञानेश्वर धनवडे (वय २१, रा. आरडा तोलाजी ता. मंठा जि. जालना, ह.मु. साई सारा कॉलनी, बजाजनगर) आणि अमित मनोहर महतो (राजपुत) (वय २३) या तिघांना ताब्यात घेतले आहे. तर रोहन सुनिल उगले, तेजस्वी विजय पवार हे फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणात मनोज जर्नादन चौधरी (वय ४६, रा. शिवशंकर कॉलनी) यांनी जवाहरनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या १७ वर्षाच्या मुलाला आरोपींनी भीती दाखवत सांगितलं की, तुमच्या घरात एक किलो सोने आहे. तुमच्या विरोधात सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल आहे. तुम्हाला अटक होईल.

हे प्रकरण मिटवण्यासाठी खंडणीखोरांनी अल्पवयीन मुलाकडून ३ तोळे २१ ग्रॅमचे सोन्याचे गंठण, तसेच १६ ग्रॅम वजनाचे गहुपोत असे सोन्याचे दागिने खंडणी स्वरूपात घेतले. या प्रकरणात खंडणी घेणाऱ्या गौरव धनवडे, वेदांत राजकुमार राठोड, तेजस्वी विजय पवार, अमित महतो, तसेच रोहन सुनिल उगले या पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# संपादकीय



## आर्थिक उदारीकरणाचे जनक

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरोमनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली.

पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# भारतीय शेतकरी जीवनातील सामाजिक संकटांची हकीकत

२३ डिसेंबर हा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो, कारण शेतकरी हा आपल्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेचा पाया आहे व देशाच्या अन्नसुरक्षेपासून ते सांस्कृतिक गुरुत्वापर्यंत अशा अनेक पैलूंमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. परंतु ताज्या (NCRB) च्या २०२३ च्या Accidental Deaths and Suicides in India या अहवालानुसार शेती व कृषीक्षेत्राशी संबधित हजारो लोकांनी आत्महत्या केल्याची घटना आपल्या सामाजिक-आर्थिक हिताच्या अंतर्गत गंभीर विचारण्यास भाग पाडते. या अहवालानुसार वर्षभरात १०,७८६ शेती क्षेत्राशी संबंधित लोकांनी आत्महत्या केली आहे जेथे ४,६९० शेतकरी आणि ६,०९६ शेती मजूर यांचा समावेश आहे, आणि हे आकडे देशातील एकूण १,७१,४१८ आत्महत्यांपैकी सुमारे ६.३% इतका भाग आहे, म्हणजे रोज सरासरी जवळपास २९ ते ३० शेतकरी किंवा शेती मजूर आपल्या जीवनाचा निरोप घेत आहेत, आणि या आकडेवारीतील सामाजिक अर्थाचा अंतर्भाव आपल्याला शेतकरी समुदायाच्या जीवनातील खोल सामाजिक समस्यांकडे समजूतदारपणे पाहण्यास भाग पाडतो. या छउठइ अहवालातील आकडे लिंगानुसार विभागले असता लक्षात येते की शेतकरी व शेती मजूर समुदायातील आत्महत्यांमध्ये पुरुषांची संख्या जास्त दिसते. आकडेवारीनुसार ४,६९० शेतकऱ्यापैकी ४,५५३ पुरुष व १३७ महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तसेच ६,०९६ शेती मजूरांपैकी ५,४३३ पुरुष व ६६३ महिला शेती मजुरांनी आत्महत्या केली आहे, आणि या विभाजनातून आपण पाहू शकतो की शेतकरी समाजातील पुरुष आणि महिला दोघांवरही विविध स्वरूपांचे सामाजिक व आर्थिक तणाव परिणाम करीत आहेत. पुरुष शेतकऱ्यांवर सामाजिक प्रतिष्ठा, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी, पिकांचे उत्पन्न आणि घराचा भरणा यासारख्या मानसिक दबावाचे भार अधिक स्पष्टपणे दिसतो, तर महिला शेतकरी व मजुरांना त्यांच्या कुटुंबातील भूमिकांबरोबरच आर्थिक सहभाग आणि सामाजिक मनोवैज्ञानिक ताण यांचा तडाखा भोगावा लागतो, ज्यातून आत्महत्येच्या घटनांचा सामाजिक-मानसिक संदर्भ अधिक गुंतागुंतीचा बनतो. राज्यवार आकडे पाहिले असता, आपले महाराष्ट्र हे राज्य NCRB अहवालानुसार सर्वाधिक आत्महत्यांच्या घटनांमध्ये अग्रस्थानावर आहे, जिथे सुमारे ३८.५% शेती क्षेत्राशी संबंधित आत्महत्यांचे प्रकरणे महाराष्ट्रातून नोंदली गेली आहेत, त्यानंतर कर्नाटक (२२.५%), आंध्र प्रदेश (८.६%), मध्य प्रदेश (७.२%) आणि तमिळनाडू (५.९%) अशा राज्यांमध्ये ही संख्या महत्त्वाची आहे, आणि या आकड्यांमधून हे स्पष्ट होते की कृषीप्रधान राज्यांमध्ये शेतकरी व शेती मजूर समुदायाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे, जे ग्रामीण जीवनातील परिस्थितीच्या विविध पैलूंशी जुळलेले आहेत. छउठइ अहवालानुसार आत्महत्यांच्या या घटनांमध्ये वार्षिक उत्पन्न ₹१,००,०००पेक्षा कमी असलेल्या लोकांचा वाटा सुमारे ६६.२% इतका आहे, आणि या आकड्यामुळे आर्थिक असुरक्षा हा शेतकरी जीवनातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे स्पष्ट होते, कारण अनेक शेतकरी आपल्या उत्पन्नावर अवलंबून असतात आणि त्यांच्या वार्षिक उत्पन्नातील कमी पडलेले प्रमाण त्यांच्या कुटुंबीय खर्च, उत्पादन खर्च, कर्जाची परतफेड आणि सामाजिक आवश्यकतांसोबत सरेखित होत नाही, ज्यामुळे आर्थिक तणाव वाढतो आणि तो सामाजिक प्रतिष्ठा व मानसिक स्वास्थ्यावर खोल परिणाम करतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषित केल्यास शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ आर्थिक संकटापुरता मर्यादित नसून, तो सामाजिक संरचनेतील खोल समस्यांचे प्रतिबिंब आहे, कारण शेतकरी समुदायाच्या जीवनात सामाजिक प्रतिष्ठा, समुदायातील स्थान, कुटुंबीय जबाबदाऱ्या, कर्जाचा दबाव, बाजार भावातील अनिश्चितता, हवामानातील बदल, पिकांचे नुकसान व सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा अभाव हे सर्व घटक एकत्रितपणे त्यांच्या मानसिक अवस्थेवर हे गंभीर प्रभाव टाकतात. त्यामुळे हा विषय व्यक्तिगत वृत्तीचा प्रश्न नाही तर सामाजिक-आर्थिक संरचनात्मक अस्तित्वाचा प्रश्न आहे. सामाजिक प्रतिष्ठा हा भारतीय ग्रामीण क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे, ज्याचा प्रभाव शेतकऱ्याच्या सामाजिक जीवनावर, कुटुंबीय नात्यावर आणि समुदायातील स्थानावर दिसून येतो, आणि जेव्हा आर्थिक परिस्थिती व सामाजिक अपेक्षांमध्ये विसंगती निर्माण होते, तेव्हा तो मानसिक ताणात बदलतो. या ताणाचा परिणाम त्यांच्या निर्णय प्रक्रियेतून गंभीर निर्णयाकडे वळू शकतो, ज्यामध्ये आत्महत्याकडे वळण्याची शक्यता वाढते, कारण सामाजिक प्रतिष्ठा, घरातील आर्थिक स्थिती आणि सामाजिक अपेक्षांचा संयुक्त प्रभाव त्यांच्या चिंतनात प्रमुख भूमिका बजावतो. ग्रामीण समाजातील पारंपारिक सामाजिक संरचना, जिथे शेतकरी समुदाय सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये, परंपरा आणि सामाजिक सहयोग यावर आधारित असतो, आता बदलत्या आर्थिक युगात अधिक आव्हानात्मक बनत आहे, कारण आर्थिक दबावाने पारंपारिक सामाजिक समर्थन प्रणाली कमजोर होत आहे. शेतकरी कुटुंबातील पुरुष व महिला दोघांनाही विविध सामाजिक अपेक्षांचा सामना करावा लागतो आणि या अपेक्षांचे ताण त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम करतात. पुरुष शेतकरी, विशेषतः घरातील एक उत्पन्नकर्ता म्हणून, आर्थिक दबाव, कर्जाचे वाढते दडपण आणि कुटुंबीय अपेक्षा यांचा अत्यधिक ताण अनुभवतात, तर महिला शेतकरी व शेती मजूरांना कुटुंब, घरकाम आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचा तणाव जास्त जाणवतो. त्यामुळे दोन्ही लिंगांमध्ये मानसिक ताणाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी परिणाम हे सामाजिक आणि व्यक्तिगत दोन्ही स्तरावर खोलवर दिसतात. श्रमाचे स्वरूप व शेतकरी आयुष्याचा नैसर्गिक अवलंबित्व यामुळे, हवामानातील बदल, पर्जन्याचे अनियमित स्वरूप, पिकांचे अपयश व उत्पादन खर्चातील वाढ हे सर्व शेतकऱ्यांच्या जीवनात (एलेपोळल ॲलीज्ञ) आर्थिक जोखीम वाढवतात. ज्या परिस्थितीत शेतकरी पावसावर विश्वास ठेवून पिके पेरतात आणि पावसाळ्यातील अनियमित पावसामुळे पिकांचे नुकसान होते, तेव्हा त्यांची आर्थिक स्थिती गंभीर संकटात येते. यासोबतच बाजारभाव कमी मिळाल्यास पिक उत्पादनाच्या खर्चाची भरपाईही होत नाही आणि त्यामुळे उत्पन्नात मोठी घट होते. अशा परिस्थितीत अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्यात अडकतात आणि कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांना मानसिक दबाव आणि सामाजिक प्रतिष्ठेतील ताणाला सामोरे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्या जीवनात मानसिक सामाजिक असुरक्षा वाढते. हे सर्व घडताना सामाजिक समर्थन, समुदायाचा सहभाग, शेतकऱ्याना शाळा, शिक्षण व आरोग्य सुविधा यांचा अभाव ही समस्या आणखी जटिल करते.

शेतकरी आत्महत्यांचा तपशील पाहिल्यास लक्षात येते की केवळ कर्ज हे एकमेव कारण नसून असे अनेक सामाजिक आणि मनोवैज्ञानिक कारणे आहेत ज्यांचा परिणाम आत्महत्यांचे आकडे वाढवण्यात दिसतो. ग्रामीण समाजात आर्थिक संकट व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणामुळे, व्यक्ती मनोवैज्ञानिकदृष्ट्या निष्काळजीपणा आणि निराशा यांना सामोरे जातात. सामाजिक स्वीकार, आत्म-आदर, कुटुंबातील भूमिका आणि समाजातील स्थान हे घटक त्यांच्या मानसिक स्थितीवर प्रभाव टाकतात. जेव्हा शेतकरी आर्थिक दृष्ट्या कमजोर असतो आणि सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते, तेव्हा मानसिक तणाव व सामाजिक दबाव यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला गंभीर आव्हान देतो, ज्यामुळे आत्महत्येच्या घटनांची शक्यता वाढते.

ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक असमानता, पायाभूत सुविधा व सामाजिक सुरक्षा यंत्रणांचा अभाव, आरोग्य व शिक्षण सुविधांचा मर्यादित विस्तार, सूचना व प्रशिक्षणाची कमतरता, महिला व पुरुष शेतकऱ्यांमध्ये उपलब्ध संसाधनांचा फरक आणि सामाजिक सहभाग यांचा परिणाम त्यांच्या जीवनातील मानसिक प्रश्नांवर दिसून येतो. जिथे सामाजिक-संस्कृतिक वातावरण मजबूत आहे, तिथे सामाजिक समर्थन, समुदायातील सहकार आणि पारिवारिक आधार यामुळे शेतकऱ्यांना मानसिक ताणातून बाहेर पडण्याची अधिक क्षमता असते, परंतु जिथे सामाजिक एकांतता, आर्थिक दबाव आणि समर्थनाचा अभाव आहे, तिथे शेतकरी व मजूर समुदायाला आत्महत्यांकडे वळण्याचा अधिक धोका जाणवतो. ग्रामीण समाजातील सामाजिक नेटवर्क आणि पारंपारिक सहायता पद्धतींचा परिणाम आत्महत्यांच्या घटनांवर नकारात्मक स्वरूपात दिसतो, कारण जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व मानसिक आधार मजबूत होत नाही, तोपर्यंत व्यक्ती स्वतःच्या स्थितीशी संघर्ष करत असतात, आणि शेवटी हा संघर्ष त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम दर्शवतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमागील सामाजिक मूल्यांचे विश्लेषण हे आपल्याला सांगते की सामाजिक निर्बंध, पारंपारिक प्रतिष्ठा, कुटुंबीय अपेक्षा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक-मानसिक दबाव हे सर्व घटक एका गुंतागुंतीच्या संयोगातून त्यांच्या जीवनावर दबाव टाकतात. ग्रामीण समाजात आर्थिक संधींचा अभाव, सामाजिक सुरक्षा व विमा या यंत्रणांचा अपुरा विस्तार, मानसिक समुपदेशन सुविधा नाहीत किंवा मर्यादित आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मानसिक संघर्षाचे मुक्तपणे भाष्य करण्याची व उपाय शोधण्याची संधी कमी मिळते. यामुळे त्यांना आयुष्यातील समस्यांचा सामना करताना त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक प्रतिष्ठेच्या ताणाशी जुळवून घ्यावे लागते, आणि हे संघर्ष त्यांच्या मानसिक स्थितीवर खोल परिणाम करतात ज्यातून आत्महत्या सारख्या चरम निर्णयाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढते.

शेतकरी आत्महत्यांच्या आकड्यांमागील सामाजिक प्रतिमांचा अभ्यास करताना असे दिसून येते की आर्थिक धोरणे, बाजार व्यवस्था, शासकीय योजना, कृषी विमा, न्यूनतम समर्थन मूल्य आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांचा प्रत्यक्ष परिणाम जमिनीवर कसा लागू होत आहे, हेही महत्त्वाचे आहे. अनेक वेळा योजनांचे प्रत्यक्ष कार्यान्वयन, पारदर्शकता, वैयक्तिक व सामाजिक मतभेद, स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता यांचे मिश्रित परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात दिसतात. कृषी विमा योजना प्रत्यक्षात उपयोगी पडत नाहीत किंवा तितक्या परिणामकारकपणे लागू होत नाहीत, चडझ चा लाभशून्य होतो, कर्ज परतफेडीची वेळ व व्याज यांचा दबाव वाढतो, आणि उत्पादन खर्चाचा भार अधिकच वाढतो. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील अनिश्चितता आणि तणाव हे वाढते आणि सामाजिक प्रतिष्ठा व आत्म-आदर यांच्यात विरोधाभास निर्माण होतो, ज्याचा मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होतो. राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आमच्या समाजाला एक चिंतनात्मक व व्यापक दृष्टीकोनातून शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक तणाव, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील जटिल नाते समजून घेण्याची संधी देतो. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की शेतकरी समुदाय केवळ अन्नाचे उत्पादक नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानसिक दृष्टिकोनातून आपला समाज टिकविणारा पाया आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण फक्त आर्थिक उपाययोजना किंवा कृषी सुधारणा पुरते मर्यादित नसून, सामाजिक सुरक्षा, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण व प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, आर्थिक समावेशन, सामाजिक सहभाग व पिकांच्या बाजारभावाचे संरक्षण यांचा एक समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सामाजिक नेटवर्क, समुदाय आधारित सहयोग, आरोग्य व मनोवैज्ञानिक समर्थन, कुटुंबीय सल्ला, समुपदेशन, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय हे सर्व घटक एकत्रितपणे शेतकऱ्यांना स्थिर व सकारात्मक भवितव्याकडे मार्गदर्शन करू शकतात.

शेवटी, राष्ट्रीय शेतकरी दिन हा दिवस आपल्या सामाजिक धारणा व मूल्यांना नव्याने परिभाषित करण्याची, शेतकऱ्यांना सन्मान, सुरक्षा, प्रतिष्ठा आणि गरिमापूर्ण जीवनमान देण्याची एक सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. शेतकरी संकट हे फक्त कृषीशी निगडीत समस्या नाही, तर सामाजिक-मानसिक-आर्थिक समग्र समस्या आहे, आणि त्याचे निराकरण करण्यासाठी शासन, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सरसकट नागरिकांनी एकत्र येऊन व्यापक सामाजिक व धोरणात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शेतकरी दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे ध्येय आणि त्यांच्या संघर्षाचे सामाजिक परिणाम हे आपल्या सर्वांचे कल्याण आणि प्रगती यांना जोडलेले आहेत, आणि त्या दिशेने सामाजिक न्याय, आर्थिक सुरक्षा व मानसिक आरोग्य सुनिश्चित करणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे.

**डॉ.राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## यशाचे गमक

काय चुकले सांगतात
शक्ती देती आंदोलक
दिशा मिळे प्रशासका
बनवती समर्थ पालक

सुस्थिर ठेवी पायावरी
सांगेतुम्ही नसे मालक
हा पब्लिक ट्रान्सपोर्ट
बनवी चाणाक्ष चालक

खुर्ची जेंव्हा सोडतालं
खिसा हवा कफल्लक
जनस्नेह शिदोरीसोबत
चमचम चमके लोलक

असू दे कठिणसमस्या
घटना त्या हृदयद्रावक
दे निर्धारधार लढायची
हे मदतीला स्वयंसेवक

भोवताल भरले निंदक
खणती टिकेचे खंदक
तल्लीनजनसेवेत नीत
साधना करता साधक

घ्यायची झोळी छोटी
द्यायलेअसावे मुबलक
प्रगतिपथावरी दौडावा
रे विजय अश्व अबलक

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# फटाक्यांवर बंदी घालणेच योग्य !

## वाचक पत्र

फटाके फोडल्याने येणाऱ्या आवाजाने आणि निर्माण होणाऱ्या रोषणाईने तात्पुरते बरे वाटत असले तरी त्यामुळे होणारी हानी कित्येक पटीने जास्त आहे. दूषित हवा आणि वाढलेले प्रदूषण यांचे डोक्यावर सावट असतानाही यंदा दिवाळीत प्रचंड प्रमाणात फटाके फोडले गेले. परिणामी अनेक ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या, श्वसन विकार असणाऱ्यांना, वृद्धांना, गर्भवती महिलांना, मुक्या प्राण्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला. यातून लहान मुले आणि तरूणही सुटले नाहीत. न्यायालयाने दिवाळीत फटाके फोडण्याला वेळेचे बंधन घालून दिले असताना त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच राहिली . काही दिवसांवर ख्रिसमस आणि नववर्ष येऊन ठेपले आहे. यानिमित्ताने पुन्हा फटाक्यांची आतषबाजी केली जाईल, पुन्हा प्रदूषणामध्ये वाढ होईल. शहरांतील दिवसागणिक वाढत्या प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांमुळे आज अनेकांनी शहर सडून गावाकडे जाण्याचा निर्णय घेतला आहे.

फटाक्यांमुळं होणारी हानी लक्षात येऊनही लोकांमधील बेफिकिरी काही केल्या कमी होत नाही, न्यायालयाच्या आदेशाला लोक जुमानत नाहीत. तर दुसरीकडे फटाके कंपन्यांमध्ये आणि गोदामांमध्ये वर्षभर कुठे ना कुठे आगी लागून जीवित आणि वित्त हानी होतच असते. हे सर्व लक्षात घेता लोकांच्या जीवावर उठणाऱ्या फटाक्यांची खरंच आपल्याला गरज आहे का ? फटाके नसले तर आपल्या आनंद साजरा करण्यामध्ये काही उणीव भासणार आहे का ? याचाही विचार करायला हवा. फटाक्यांमुळे दरवर्षी अग्निशमन दल आणि पोलीस दल यांच्यावर प्रचंड ताण येत असतो, न्यायालयालाही यामध्ये हस्तक्षेप करावा लागतो, त्यामुळे फटाक्यांचा हा पांढरा हत्ती पोसण्यापेक्षा सरकारने फटाक्यांवर सरसकट बंदी घालावी !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# शाळांची बदलती स्नेहसंमेलने !

सध्या शाळा आणि महाविद्यालयांची वार्षिक स्नेहसंमेलन सर्वत्र सुरु आहेत. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी मुलांचे नृत्य, नाटिका, एकपात्री प्रयोग यांसारखे कार्यक्रम यानिमित्ताने भरवले जातात. शिशुवर्गापासूनच्या मुलांना नृत्याच्या कार्यक्रमात सहभागी करून घेतले जाते. प्रत्यक्ष कार्यक्रमाआधी महिनाभरापासून मुलांकडून कसून सराव करून घेतला जातो. बड्या खासगी शाळांकडून स्नेहसंमेलनासाठी वातानुकूलित शाही सभागृह आरक्षित केले जाते. संमेलनाला समस्त पालकांना निमंत्रित केले जाते. मुलांच्या वेशभूषेपासून सभागृहाच्या आरक्षणाचा आणि पाहुण्यांच्या चहा-पाण्याचा खर्चही बहुतेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वसूल केला जातो. मुलांच्या शाळाप्रवेशासाठी लाखोंचे डोनेशन देणाऱ्या पालकांचीही याला हरकत नसते. आपली मुले पहिल्यांदा व्यासपीठावर नृत्य करणार या कल्पनेनेच गदगद झालेले पालक आपल्या पाल्याचा नृत्याविष्कार पाहण्यासाठी नोकरी व्यवसायातून सुट्टी घेऊन जातीने उपस्थित राहतात. प्रत्यक्षात कार्यक्रम पाहताना एकसारखी वेशभूषा केलेल्या २५-३० मुलांच्या गराड्यात आपले बाळ ओळखताना पालकांचाही वेळ जातो. बाळाला केंद्रित करून बाळाचे नृत्य आपल्या मोबाईलमध्ये ध्वनिचित्रित करताना बिचाऱ्या पालकांनाही चांगलीच कसरत करावी लागते. हल्ली टीव्ही चॅनल्सवर चालणाऱ्या लहान मुलांच्या नृत्याच्या रिऍलिटी शोजचा परिणाम या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमांवरसुद्धा सध्या पडू लागला आहे. आपल्याकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात बालगीते आणि बडबड गीतांचे भांडार असताना काही शाळांत दुसरी तिसरीच्या कोवळ्या मुलांना हिंदी चित्रपटातील रोमँटिक अथवा आयटम साँग्सवर नाचवले जाते. ज्या गाण्यातील शब्दांचा अर्थही मुलांना माहीत नसतो अशा गाण्यांवर मादक हालचाली आणि हातवारे करणाऱ्या या कोवळ्या मुलांच्या नृत्यावर हसावे कि रडावे हेही नेमके कळत नाही. विशेष म्हणजे उपस्थित पालकही अशा नृत्यांच्या सादरीकरणावर बेहद खुश होऊन शिट्या आणि टाळ्यांची बरसात करतात. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या स्नेहसंमेलनातून मुलांवर कुसंस्कार तर होत नाहीत ना याचे भान शाळा व्यवस्थापनाने राखायला हवे !

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर सोडली का? मिरा भाईंदर युवक कॉंग्रेस चा सवाल

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२२, मिरा भाईंदर :** मिरा-भाईंदरच्या प्रभाग १५ मध्ये एकाच आठवड्यात दुसऱ्यांदा लागली आग, शासन-प्रशासन कधी लक्ष घालणार?

पांडुरंग वाडी, लोढा ऍक्वा येथील 'बुकर' या होलसेल व्यापारी शोरूमच्या बेसमेंटला आग लागली ज्यामुळे संपूर्ण परिसरात धुराचे आणि भीतीचे वातावरण तयार झाले आहे. अग्निशमक दल मोठ्या शर्थीने आग विझवण्याचा प्रयत्न करत आहे. प्राथमिक माहिती नुसार कोणतीही जीवितहानी झालेली नाही व परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र एकाच आठवड्यात एकाच भागात दुसऱ्यांदा लागलेल्या आगीमुळे शहरातील नागरिकांच्या जीवाची सुरक्षा शासन-प्रशासनाने वाऱ्यावर सोडली आहे का? असा प्रश्न युवक कॉंग्रेस अध्यक्ष सिद्धेश प्रकाश राणे यांनी उपस्थित केला. तसेच सदर मॉल, कमर्शीयल इमारती यांच्या फायर NOC/Inspection चा मुद्दा सुद्धा उपस्थित करण्यात आला. तदप्रसंगी युवक जिल्हाध्यक्ष सिद्धेश प्रकाश राणे, उपाध्यक्ष दिपक बागडी, प्रवक्ते रवि खरात व अन्य युवक कॉंग्रेस चे कार्यकर्ते उपस्थित होते.

## के.रामलू पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२२, कुंडलवाडी (नांदेड) :** सोमवार, दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी 'राष्ट्रीय गणित दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष व तसेच प्रमुख पाहुणे म्हणून के.रामलू पब्लिक स्कूल या संस्थेचे संचालिका रमा ठक्कुरवार उपस्थित होते. भारतीय गणित तज्ञ 'श्रीनिवास रामानुजन' यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रिंसिपल जे.संभाजी यांनी रामानुजन यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी इयत्ता ८ ते १० वी वर्गातील विद्यार्थीनींनी गणित, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र विषयातील रांगोळी व तसेच पोस्टर प्रेझेंटेशन केले. ६वी ते ९वी वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनीने रामानुजन यांच्या कार्याबद्दल भाषणातून माहिती दिली. कर्मचा-यांपैकी अजय रणवीरकर, लाड, अर्चना यांनी राष्ट्रीय गणित दिनाच्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या अध्यक्षीय समारोप करताना सौ रमा ठक्कुरवार यांनी सर्वांना राष्ट्रीय गणित दिनाच्या शुभेच्छा देवून रामानुजन यांच्या गणित विषयातील योगदानाची माहिती दिली व विद्यार्थ्यांनी रामानुजन यांना आदर्श मानून चिकित्सक वृत्ती बाळगावी असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन भास्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन कामाजी यांनी केले.

## कंटेनर - दुचाकीची भीषण धडक
## अंगणवाडी सेविका जागीच ठार; युवक गंभीर जखमी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** लासलगाव - टाकळी बायपास रोडवरील अंबिका हॉटेलजवळ दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी टाटा कंटेनर व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात ३५ वर्षीय अंगणवाडी सेविका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून, दुचाकी चालक युवक गंभीर जखमी झाला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १.२५ वाजण्याच्या सुमारास टाटा कंटेनर (क्रमांक एम.एच. ४६ सी.एल. ४०३०) व बजाज प्लॅटिना दुचाकी (क्रमांक एम.एच.१५ ई.एम.१९१२) यांच्यात जोरदार धडक झाली.

या अपघातात दुचाकी चालक तुषार भाऊसाहेब पानगव्हाणे हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. दुचाकीच्या मागे बसलेल्या गंगा उर्फ गायत्री हेमंत घायाळ (वय ३५, रा.पाबळवाडी, ता.निफाड) या अंगणवाडी सेविकेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

## दिवा स्टेशन जवळील तलाव तातडीने स्वच्छ करण्याची भाजपची मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, दिवा (ठाणे) :** दिवा स्टेशन जवळील तलाव तातडीने स्वच्छ करण्याची दिवा भाजपने मागणी केली आहे. दिवा शहरातील स्टेशन परिसरात असलेला एकमेव तलाव सध्या अत्यंत घाणेरड्या व दुर्लक्षित अवस्थेत असून तलावांचे शहर म्हणून ठाण्याची ओळख असलेल्यांपैकी दिवा रेल्वे स्थानक पूर्वेकडील सदर तलावामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा, प्लास्टिक, सांडपाणी तसेच जलकुंभ (हायसिंथ) साचलेले असून त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे.

तलावाची ही अवस्था आरोग्याच्या दृष्टीने अतिशय धोकादायक असून मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.तरी सदर तलावाची तातडीने स्वच्छता करून कचरा व जलकुंभ काढण्यात यावा.

तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. यासाठी योग्य ती नियमित देखभाल व्यवस्था करण्यात यावी. व या गंभीर विषयाची तातडीने दखल घ्यावी असे निवेदनाद्वारे दिवा भाजप मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांना केली आहे.

# वेठबिगारीच्या जाचातून ९ मजुरांची पोलिसांनी केली सुटका

## दोन जाणांविरुद्ध गुन्हा दाखल



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कुरुंद येथे नरवडे मळ्यात शेतीच्या कामाला व गुरे वळण्यासाठी डांबून ठेवलेल्या ९ वेठबिगारांची पारनेर पोलिसांनी दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुटका केली.

महिन्यांपूर्वी पुणे व अहिल्यानगर येथिल रेल्वे स्थानकावरून या ९ जणांना चांगले काम देतो असे सांगून नेले होते. अन्नपाणी न देता, वेगवेगळ्या कालावधीमध्ये १ ते २ महिन्यांपासून बळजबरीने त्यांच्याकडून गुरे वळण्याचे व शेतीची कामे करून घेतली जात होती. तसेच रात्री त्यांना एका खोलीत डांबून ठेवण्यात आले होते.

याबाबत पारनेर पोलिस ठाण्याचे फौजदार शिवाजी कडूस यांना १७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी गुप्त माहिती मिळाली. त्यानंतर पोलिस पथकाने कुरुंद येथे जाऊन छापा टाकला. त्यावेळी तेथे २ आरोपींनी ९ वेठबिगारांना ग्रामपंचायत कार्यालयाजवळ बसवून ठेवलेले दिसले. या वेठबिगारांना पारनेर पोलिस ठाण्यात आणून त्यांची सुटका करण्यात आली. पारनेर पोलिसांनी आरकेश बढ्या काळे (वय ६५) व नितेश आरकेश काळे (वय ४५) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत कॉन्स्टेबल सागर शिवाजी साबळे (वय ३७) यांनी फिर्याद दिली. उपविभागीय पोलिस अधिकारी गिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संतोष खेडेकर, सहायक निरीक्षक नितीन खंडागळे, फौजदार शिवाजी कडूस, हेडकॉन्स्टेबल अमोल धामणे, कल्याण लगड, कॉन्स्टेबल सागर साबळे, सारंग वाघ, गणेश डोंगरे, हर्षदा ढुबे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**माझे वडील शोधण्यात पोलिस पथक अपयशी**

माझे वडील आंतरवली सराटी येथून गायब झाले होते. त्यांचा मी शोध घेतला असता माझे वडील पारनेर तालुक्यातील कुरुंद येथे असल्याचे समजले. मी स्वत: कुरुंद गाव गाठले. आंतरवली सराटी येथून मनोज जरांगे पाटलांनी त्यांच्या कुरुंद येथिल समर्थकांना फोन करत मदत करण्याची मागणी केली. त्यानुसार त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळास भेट दिली असता जवळपास ४० लोकांना ओलीस ठेवल्याचे समोर आले. या सर्वांनी ही बाब पारनेर पोलिसांना कळवली. पोलिसांनी माझ्या वडिलांना शोधण्याचे सोडून मला मदत करणाऱ्या तरुणांनाच आरोपींच्या पिंजऱ्यात उभे करण्यास सुरुवात केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. मानवी तस्करी सारख्या गंभीर प्रकरणात पारनेर पोलिसांनी अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. आरोपींना नागरिकांनी ताब्यात दिले असताना ही पोलीसांनी त्यांना का सोडून दिले असा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्यांना ताब्यात घेतले त्यांच्यावर काय कारवाई झाली? माझे वडील सात दिवस होत आले असतानाही का मिळून आले नाहीत याचे उत्तर आजही मिळायला तयार नाही.

**- अर्चना साबळे, छत्रपती संभाजीनगर**

# चंद्रपूर येथील पंडित दीनदयाल उपाध्याय कॅन्सर रुग्णालयाचे लोकार्पण



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्याची कीर्ती वाढवणारे एक आदर्श आरोग्य केंद्र म्हणून पंडित दीनदयाल उपाध्याय कॅन्सर हॉस्पिटलकडे पाहिले जाईल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी व्यक्त केला. चंद्रपूर येथे सुमारे २८० कोटी रुपये खर्चून उभारलेल्या १४४ खाटांच्या भव्य व अत्याधुनिक पंडित दीनदयाल उपाध्याय कॅन्सर हॉस्पिटलचे लोकार्पण त्यांच्या शुभहस्ते पार पडले. या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

या हॉस्पिटलमुळे चंद्रपूर जिल्ह्यासह परिसरातील कॅन्सरग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. चंद्रपूर येथील पंडित दीनदयाल उपाध्याय कॅन्सर हॉस्पिटलच्या लोकार्पण सोहळ्याला चंद्रपूर कॅन्सर केअर फाऊंडेशनचे संचालक डॉ.कैलास शर्मा, जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, डॉ. अजय चंदनवाले यांची उपस्थिती होती.

आरोग्य आणि शिक्षण या सम ाजाच्या मूलभूत गरजा असून त्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विकेंद्रित, सुलभ व परवडणारी सेवा असावी, असे डॉ.मोहन भागवत यांनी सांगितले.

कॅन्सरसारख्या आजारामुळे रुग्ण तर मानसिक व शारीरिकदृष्ट्या खचतोच, शिवाय रुग्णाच्या कुटुंबाला ही मानसिक, आर्थिक आणि सामाजिक संकटाचा सामना करावा लागतो. त्यामुळे रुग्णावरील उपचारांसोबतच त्यांच्या कुटुंबाला मानसिक आधार देणे अत्यंत आवश्यक आहे. तपासणी व उपचारासाठी वारंवार प्रवास करावा लागतो. मोठ्या प्रमाणात खर्च होतो आणि निवासाच्या अडचणीही येतात. ते लक्षात घेता उपकेंद्रांच्या माध्यमातून रुग्णांच्या जवळ सेवा नेण्याचा विचार हा प्रभावी आणि दूरदृष्टीपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी या केंद्राच्या यशस्वी कार्यासाठी समाजाच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. कॅन्सर रुग्ण व त्यांच्या कुटुंबांना आधार देणे ही केवळ हॉस्पिटलची जबाबदारी नसून समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे सांगत त्यांनी सेवाभाव, संवेदनशीलता आणि सहकार्याच्या माध्यमातून हे केंद्र आदर्श ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कॅन्सरसारख्या गंभीर आजाराच्या उपचारांसाठी नागपूर किंवा मुंबईसारख्या लांबच्या शहरांवर अवलंबून राहावे लागू नये. ह्या हॉस्पिटलमागचा मूलभूत हेतू असल्याचे ही पूजनीय सरसंघचालकांनी नमूद केले. चंद्रपूरमध्येच उच्च दर्जाची तपासणी, उपचार आता उपलब्ध झाल्याने रुग्णांचा वेळ, खर्च आणि मानसिक ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून केवळ वैद्यकीय उपचारच नव्हे, तर करुणा, संवेदनशीलता आणि सेवाभाव यांचा संगम घडून येईल आणि तेच या हॉस्पिटलचे खरे सामर्थ्य ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. पंडित दीनदयाल उपाध्याय कॅन्सर हॉस्पिटलचे लोकार्पण हा चंद्रपूर व विदर्भातील जनतेसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने ऐतिहासिक क्षण असल्याची भावना आ.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. पूजनीय सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या शुभहस्ते हे रुग्णालय जनतेस अर्पण होताना पाहणे हा अत्यंत समाधानकारक व प्रेरणादायी क्षण असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले. या हॉस्पिटलमुळे हजारो कुटुंबांना दिलासा, आत्मविश्वास आणि नवसंजीवनी मिळेल, असा ठाम विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

**रुग्णालयाची वैशिष्ट्ये**

तळमजला + ४ मजले : १,००,०००+ चौ. फूट बांधकाम,१४० बेडचे अत्याधुनिक कॅन्सर उपचार केंद्र, लीनीअर एक्सलेरेटर्स (२), ब्रेकीथेरपी, मॅमोग्राफी, ३डी/४डी अल्ट्रासाऊंड, डिजिटल एक्स-रे, केमोथेरपी, सर्जिकल ऑन्कोलॉजी, प्रगत प्रयोगशाळा अत्याधुनिक सुविधा या रुग्णालयात उपलब्ध आहे.

# श्री.मतोबा महाराज यात्रोत्सवास दि.३ जानेवारीपासून उत्साहात प्रारंभ


## पहाटे ५ वाजता महापूजा, सकाळी ८.३० वाजता रथपूजा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व नैताळे ग्रामस्थांचे आराध्य दैवत श्री.मतोबा महाराज यांचा यात्रोत्सव दि.३ जानेवारी पासून उत्साहात सुरू होणार असून हा उत्सव दि.१८ जानेवारी पर्यंत अखंड सुरू राहणार आहे. यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री.मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव बोरगुडे व विश्वस्त मंडळाने दिली.

नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथे दरवर्षी पौष पौर्णिमेनिमित्त श्री.मतोबा महाराजांचा यात्रोत्सव भरवला जातो. यावर्षी दि.३ जानेवारी रोजी पौष पौर्णिमा असल्याने यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पहाटे ५ वाजता भागवताचार्य ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली शिंदे (साधना आश्रम, रुई) तसेच कृषीराज ॲग्रो सर्व्हिसेचे संचालक प्रकाश पगार व छाया पगार यांच्या हस्ते श्री.मतोबा महाराजांच्या नवीन चांदीच्या मूर्तीची महापूजा होणार आहे.

त्यानंतर सकाळी ८.३० वाजता बोकडदरे येथील भारत माता आश्रमाचे महंत श्री महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते रथपूजा संपन्न होणार आहे. यावर्षी रथ मिरवणुकीस प्रारंभ करताना रथाला पहिली बैलजोडी जुंपण्याचा मान सिन्नर तालुक्यातील पाटवाडी येथील शेतकरी नंदकिशोर महात्मे यांना देण्यात आला आहे.



सध्या देवस्थान परिसरात विविध ठिकाणी बांधकाम सुरू असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी देवस्थान ट्रस्ट प्रयत्नशील आहे. यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दर्शन रांगेसाठी बांबू - बल्लयांची बांधणी करण्यात येणार असून भाविकांना उन्हापासून संरक्षणासाठी मंडप उभारण्यात येणार आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.

यात्राकाळात गर्दीचे नियोजन व नियंत्रणासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांना ओळखीसाठी टी - शर्ट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भाविकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच नारळ फोडण्यासाठी यंत्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यात्रोत्सव काळात दररोज सकाळी ६, दुपारी १२ आणि संध्याकाळी ७ वाजता संगीतबद्ध आरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

**श्री.मतोबा महाराज देवस्थान ट्रस्टचा चांदीची नवीन मूर्ती करण्याचा निर्णय !**

आराध्य दैवत श्री.मतोबा महाराज मंदिरातून दि.३ डिसेंबर रोजी मध्यरात्री दोन मूर्तीची चोरी झाली होती. निफाड पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखा चोरी प्रकरणाचा तपास करीत आहेत. संतप्त नागरिकांनी रास्तारोको आंदोलन करून तातडीने मूर्तीचा तपास लावावा अशी मागणी केली होती. त्यावेळी पोलिस उपअधिक्षक कांतीलाल पाटील यांनी तातडीने तपास पूर्ण करून आरोपींना पकडण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, सदर घटनेला तीन आठवडे उलटूनही अद्याप चोरट्यांचा शोध न लागल्याने देवस्थान ट्रस्टने तातडीची बैठक घेऊन श्री.मतोबा महाराजांची नवीन चांदीची मूर्ती बनविण्याचा निर्णय घेतला आहे.

# ठाकरे गटाला मोठा धक्का

## माजी आमदार सुभाष भोईर भाजपात, शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, दिवा (ठाणे) :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील माजी आमदार सुभाष भोईर, जिल्हा परिषद माजी सदस्य रमेश पाटील, उंबार्ली म धील उपतालुकाप्रमुख सुखदेव पाटील, उपजिल्हाप्रमुख सुमित सुभाष भोईर, कल्याण विधानसभेचे युवा अधिकारी सूरज जाधव, दिव्याचे युवासेना शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, शिळचे विभागप्रमुख विश्वनाथ पाटील, प्रसाद पाटील, शक्ती पाटील, प्रेमनाथ पाटील, प्रदीप आलिमकर दिव्याचे शिवसेना शहर सचिव उमेश राठोड, दिव्याचे युवासेना उपशहर अधिकारी सुयोग राणे, विराज सुर्वे, दिवा विभाग अधिकारी आकाश शुक्ला, अक्षय भोईर, धनंजय बेडेकर, रविंद्र पाटील, सचिन मढवी, दिपेश चव्हाण, युसूफ खान, बद्रेश आलम खान, चित्राताई बाविस्कर, कळवा मुंब्रा विधानसभा प्रमुख अश्विन म्हात्रे, संतोष जयस्वाल, युवराज बेडेकर, प्रतिक म्हात्रे, भगवान पाटील, देवेंद्र पाटील, केवल पाटील, योगेश भोईर, प्रथमेश गायकर तसेच ठाणे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात जाहीर प्रवेश केला. सुभाष भोईर हे ठाणे महापालिकेचे पाच वेळा नगरसेवक राहिले आहेत.

कल्याण ग्रामीण मतदार संघाचे आम दार ही राहिले आहेत. यामुळे ठाणे आणि कल्याण महापालिकांच्या क्षेत्रात त्यांनी यापूर्वी प्रतिनिधीत्व केले आहे.

यावेळी माजी आमदार सुभाष भोईर म्हणाले, राजकारणात सक्रिय असताना नेहमीच जनसेवा हेच माझे अंतिम ध्येय राहिले आहे.

माझ्या भागाचा विकास आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व वनमंत्री गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, ठाणे शहराचे आमदार संजय केळकर, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे,यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करत आहे.

# अंबरनाथमध्ये बंधबिगार कामगारांची सुटका



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** एकविसाव्या शतकातही बंधबिगार पद्धती अस्तित्वात असल्याचे धक्कादायक वास्तव अंबरनाथमध्ये उघडकीस आले असून, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नेतृत्वात नाल्सा (National Legal Services Authority) योजनेंतर्गत ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाने केलेल्या कारवाईत मे. शक्ती फूड इंडस्ट्रीज कंपनी, अंबरनाथ पश्चिम या कंपनीत असलेल्या १० परप्रांतियांची बंधबिगाराच्या विळख्यातून सुखरूप सुटका करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाच्या सदस्या ॲड. तृप्ती पाटील यांनी दिली. १७ डिसेंबर रोजी कमलेश फुन्नन बनवासी, रा.उत्तर प्रदेश या बंधबिगार कामगाराने स्वतःची सुटका करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधल्यानंतर उघडकीस आली. संबंधित कामगाराने आपली व्यथा मांडल्यानंतर, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्पेशल सेलमार्फत तातडीने अर्ज तयार करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायमूर्ती रवींद्र पाजणकर यांच्याकडे सादर करण्यात आला.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पाजणकर यांनी त्वरित जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे अधिकृत पत्र दिले.नगरपालिका आणि म हानगरपालिकांच्या निवडणूकीचे अत्यंत व्यस्त कार्यक्रम असूनही जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी या प्रकरणाची तातडीने गंभीर दखल घेत संबंधित सर्व विभागांना तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या तत्परतेमुळे महसूल, पोलीस व कामगार विभाग यांचा समन्वय साधत तातडीची कारवाई सुरू करण्यात आली. उत्तर प्रदेशातील भदोही, जौनपूर आदी जिल्ह्यांतून १. सिंटु विनोद बनवासी, वय १८ वर्षे २. चंदू हरि बनवासी, वय ४० वर्षे ३. संजय डाक्टर बनवासी, वय २२ वर्षे ४. कल्लू बनवासी ५. सुरज बनवासी ६. संजय खिल्लारी बनवासी, वय १९ वर्षे ७. सुरेश बनवासी ८. सुकुड विजई ९. सुखी पन्ना १०. विजय कुमार श्रीराम, वय ३४ वर्षे यांना ठेकेदार निक्की उर्फ कृष्णा कुमार अग्रहारी व नितिन तिवारी याने चांगल्या कंपनीत १८ ते २० हजाराची नोकरी तसेच राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करुन देतो असे आमिष दाखवून अंबरनाथ पश्चिम येथील मे.शक्ती फूड इंडस्ट्रीज कंपनीत नोकरीला लावले.

मात्र प्रत्यक्षात त्यांना अत्यंत जड कामे, उपाशीपोटी काम, अपुरी व निकृष्ट जेवण व्यवस्था, मारहाण व वेतन न देणे अशा अमानुष परिस्थितीला सामोरे जावे लागले.

या कामगारांना एका लहान खोलीत कोंबून ठेवण्यात येत असे. रात्री त्या खोलीला बाहेरून कुलूप लावले जाई आणि सकाळी पुन्हा कामावर नेले जाई. मोबाईल फोन जप्त करून त्यांचा नातेवाईकांशी संपर्क तोडण्यात आला होता. हा प्रकार संगनमताने व नियोजनपूर्वक करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या निर्देशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली अंबरनाथचे तहसिलदार अमित पुरी, सर्कल अधिकारी सागवे, कामगार विभागाचे उपायुक्त संभाजी व्हनाळकर यांच्या सूचनेनुसार सहाय्यक कामगार आयुक्त अनघा क्षीरसागर यांच्या प्रतिनिधी रजनी भोर व त्यांचे इतर सहकारी, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सैय्यद यांच्या नेतृत्वाखाली पथक तैनात करण्यात आले. निवडणूक काम ात व्यस्त असतानाही सर्व अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय सहकार्य केले. ही संयुक्त कारवाई रात्री उशिरापर्यंत चालली आणि पहाटे पाच वाजता अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत १० बंधबिगार कामगारांची सुटका करण्यात आली असून, दोन ठेकेदारांना अटकही करण्यात आली आहे.

आरोपींवर बंधबिगार उच्चाटन अधिनियम, तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत मानवी तस्करीची कलमे लावण्यात आली आहेत. सुटका करण्यात आलेल्या कामगारांना बंधबिगार प्रमाणपत्र देण्यात आले असून, सर्वच्या सर्व दहाही बंधबिगार कामगार उत्तर प्रदेश येथील त्यांच्या मूळ गावी सुखरूप पोहोचले आहेत.

या प्रकरणातून आजही समाजात बंधबिगार व असंघटित कामगारांचे शोषण सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा घटना कुठेही आढळल्यास गप्प न बसता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातील स्पेशल सेल फॉरपअनऑर्गनाइज्ड सेक्टर वर्कर्सशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे करण्यात आले आहे.

# दुर्गादेवी विद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस साजरा





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर)** : आपले पाढे, सूत्र, सिद्धांत, प्रमेय पाठ असतील तर आपणास गणित हा विषय सोपा जातो असल्याचे प्रतिपादन जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे खजिनदार बाळासाहेब निवडुंगे यांनी केले.

श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ढवळपुरी येथे राष्ट्रीय गणित दिवस मोठ्या उत्साहात साजरा कारण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले गणित विषयाची भीती घालवण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने हा राष्ट्रीय गणित दिवस संपूर्ण भरातभर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

अध्यक्ष स्थानी विद्यालयाचे प्राचार्य आदम शेख हे होते. थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा २२ डिसेंबर हा जन्मदिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या भौमितिक आकृत्यांच्या रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या तसेच गणिताचे काही मॉडेल्स आणि चार्ट विद्यार्थांनी तयार केले. या दिवसाच्या अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाने घेतलेल्या ९ वी संबोध स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत कु. श्रेया गावडे हिने ८१ गुण मिळवून केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दल तिला आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्राचे वाटप प्राचार्य आदम शेख व पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी कु.श्रेया गावडे, भक्ती चौधरी, उदयनराज दरेकर, वेदांत भोंडवे, सुजित थोरात या विदयार्थ्यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा जीवनपट उलगडाला. प्राचार्य आदम शेख म्हणाले की, माणसाला सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत गणिताची गरज भासते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष व्यवहारे, वर्षा शेळके यांनी परिश्रम घेतले. यावेळी संजय दळवी, राहुल झावरे, सहादू भोंडवे, भगवान राऊत, सुभाष अडसूळ, सुरेश नवले,अरविंद कुमावत, संदीप खिलारी, सुरज थोरात, यमाजी झेंडे, शब्बीर शेख, वर्षा शेळके, निशा भोंडवे, फारूक शेख, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल ठाणगे यांनी केले तर आभार अजित सांगळे यांनी मानले.

# थोडक्यात

## डोंबिवलीत रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५० जणांनी केले रक्तदान



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** स्व. देवचंद कांबळे फाऊंडेशन व श्री डोंबिवली लोहाणा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने, चिदानंद ब्लड बँक यांच्या सहकार्याने दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर श्री डोंबिवली लोहाणा समाज हॉल, शिवमंदिर रोड, सुखसागर डेअरीच्या शेजारी येथे संपन्न झाले. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. गरजू रुग्णांसाठी रक्तसाठा उपलब्ध व्हावा, या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम यशस्वी ठरला. शिबिरास श्री डोंबिवली लोहाणा समाज व स्व. देवचंद कांबळे फाऊंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक-अध्यक्ष सदानंद थरवळ (भाई), विशाल शेटे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन रक्तदाते व कार्यकर्त्यांचे कौतुक केले. श्री डोंबिवली लोहाणा समाजाचे अध्यक्ष प्रमोद पुंजाणी, सचिव ॲड. चेतन ठक्कर, तसेच स्व. देवचंद कांबळे फाऊंडेशनचे अध्यक्ष योगेश पाटील, उपाध्यक्ष ॲड. रेखा कांबळे, सचिव आनंद पर्वते यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. या सामाजिक उपक्रमास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## मांडवे खुर्द शाळेला प्रो कबड्डीपटू प्रफुल्ल झावरे यांची भेट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवे खुर्द येथे एक खास म ुलाखत या उपक्रमांतर्गत प्रो कबड्डी लीग – तेलगू टायटन्स टीमचे नामवंत कबड्डी खेळाडू मान. प्रफुल्ल झावरे यांनी नुकतीच शाळेला भेट दिली.

वासुंदे गावातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून कठोर परिश्रम, जिद्द व आत्मविश्वासाच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या प्रफुल्ल झावरे यांनी या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि यशस्वी कबड्डीपटू होण्यासाठी मार्गदर्शन केले. अभ्यासाबरोबरच व्यायाम, खेळ व छंद यांचे जीवनातील महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना कबड्डीचे प्रात्यक्षिक दाखवून स्वतः मुलांबरोबर मैदानावर खेळत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूसोबत प्रत्यक्ष खेळण्याचा अनुभव मिळाल्याने मांडवे खुर्दसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यशवंत जाधव, मंगेश गागरे, रेवणनाथ गागरे, संजय गागरे, मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे, संदीप गाडे, बाळासाहेब खराबी, प्रितम बर्वे, लता शिंदे, मंगल झावरे, पद्मजा झावरे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवे खुर्द येथील विद्यार्थी, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने प्रफुल्ल झावरे यांचे आभार मानून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महाबळेश्वर नगरपालिकेत राष्ट्रवादीची सत्ता
## नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीचे सुनील शिंदे विजयी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२१, महाबळेश्वर (सातारा) :** १३ राष्ट्रवादी, भाजप १, अपक्ष ६ तर नगराध्यक्ष पदी राष्ट्रवादीचे सुनील शिंदे विजयी झाले. प्रभाग क्रमांक १ ते १० मधून निवडूण आलेले नगरसेवक

**पुढील प्रमाणे -**

प्रभाग १ : मधून राजू नालबंद (अपक्ष), विद्या बावळेकर (राष्ट्रवादी)

प्रभाग २ : संतोष आखाडे (राष्ट्रवादी), संगीता वाडकर (राष्ट्रवादी)

प्रभाग ३: विमल पारठे (राष्ट्रवादी), रवि कुंभारदरे (भाजप)

प्रभाग ४ : कुमार शिंदे (अपक्ष), विमल बिरामने (अपक्ष)

प्रभाग ५ : संजय जंगम (राष्ट्रवादी), स्मिता पाटील (अपक्ष )

प्रभाग ६ : नीता झाडे (अपक्ष), संतोष आबा शिंदे (राष्ट्रवादी)

प्रभाग ७ : नासिर मुलाणी( राष्ट्रवादी ), शबाना मानकर (अपक्ष)

प्रभाग ८ : राहुल पिसाळ (राष्ट्रवादी), प्रियंका वायदंडे (राष्ट्रवादी)

प्रभाग ९ : अफजल भाई सुतार (राष्ट्रवादी), रेश्मा ढेबे (राष्ट्रवादी)

प्रभाग १० : रोहित ढेबे (राष्ट्रवादी), पल्लवी कोंढाळकर (राष्ट्रवादी)

## विहिरीत पडून १३ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** नैताळे (ता. निफाड) येथील १३ वर्षीय मुलाचा विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत समाधान विठ्ठल बोरगुडे (वय ३५, धंदा शेती, रा.नैताळे, ता.निफाड यांनी पोलिसांना खबर दिली आहे. दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजेपूर्वी मुखेड ता.येवला येथील ओम दिनानाथ गुरुकुलजवळील विहिरीत सार्थक संजय बोरगुडे (वय १३) हा पडला. विहिरीच्या पाण्यात पडल्याने त्याच्या नाकातोंडात पाणी जाऊन त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद येवला ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर ७९/२०२५ नुसार भारतीय नागरिक व सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार आर. एन. पाटील करीत आहेत.